Press Release

आंध्र प्रदेश पर्यटन तिरुपती व त्याहून अधिक ठिकाणांबरोबरच श्रीकालहस्तीश्वरा मंदिराची करणार प्रसिद्धी

- कालसर्प दोष पूजा किंवा राहू-केतू पूजा करण्यासाठी हजारे भाविक मंदिरात जातात
- 10 दिवसांच्या महाशिवरात्री उत्सवासाठी लोकप्रिय

मुंबई, जून 17, 2016 : आंध्र प्रदेशमधील चित्तूर जिल्ह्यातील श्रीकालहस्तीश्वरा मंदिर 1000 हजार वर्षांहूनही जुने आहे. हे मंदिर तिरूपती विमानतळापासून केवळ 20 किलोमीटर अंतरावर आहे.

पल्लव व चोला राजे आणि विजयनगरा सम्राटांनी बांधलेले हे प्रचंड मंदिर त्याच्या आर्किटेक्चरल सौंदर्यासाठी नावाजले जाते. हे मंदिर कालसर्प दोष पूजा किंवा राहू-केतू पूजा यासाठीही प्रसिद्ध आहे. दररोज हजारो भाविकांसाठी केली जाणारी 45 मिनिटांची पूजा, हिंदू धर्मामध्ये नमूद केल्याप्रमाणे, ग्रहांच्या हालचालींतून निर्माण होणाऱ्या ग्रहदोषांसंबंधी केली जाते. मंदिराची स्वतःची गोशाळा आहे आणि राहण्याची सोय व निवासासाठी तेथे पुरेशा सुविधा आहेत. तेथे कुंड असून त्या जागी भारद्वाज महर्षी साधना करायचे.

श्रीकालहस्तीश्वरा मंदिरात जाण्यासाठी आणि कालसर्प दोष पूजा करण्यासाठी राहू काल सर्वोत्तम कालावधी समजला जातो. कारण, या पूजेसाठी वेळ अतिशय महत्त्वाची समजली जाते. ही पूजा सकाळी 6.30 वाजल्यापासून सुरू होते आणि सायंकाळी 6 वाजेपर्यंत चालते. अधिक माहितीसाठी पाहा : http://gotirupati.com/sri-kalahasti-rahu-ketu-pooja.

श्रीकालहस्तीश्वरा मंदिर फेब्रुवारी किंवा मार्च महिन्यातील 10 दिवसांच्या महाशिवरात्री उत्सवासाठीही प्रसिद्ध आहे.

मंदिरापासून केवळ एक तासाच्या अंतरावर, पुलिकत हा नयनरम्य तलाव आहे. हा तलाव अप्रतिम पक्षी अभयारण्यासाठी लोकप्रिय असून तेथे स्थलांतरित पक्षी पाहायला मिळतात. कालहस्ती मंदिराच्या दुसऱ्या बाजूला साधारण 40 किमी अंतरावर, जागतिक स्तरावर प्रसिद्ध असलेले तिरुपतीचे बालाजी मंदिर आहे. ही मंदिरे विमान वाहतूक, रस्ता व रेल्वे मार्गाने देशाच्या सर्व भागांशी जोडली आहेत.

अधिक माहितीसाठी संपर्क :

रामा नायडू उपाध्यक्ष – ॲडफॅक्टर्स पीआर 9920209623 Rama.naidu@adfactorspr.com	राहुल जैन अकाउंट डायरेक्टर - ॲडफॅक्टर्स पीआर 9867567534 Rahul.jain@adfactorspr.com